ePaper

## पत्राद्वारे छगन भुजबळांना पुन्हा जीवे मारण्याची धमकी



| वर्ष - 7 | अंक - 267 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 10 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- इंडिया ऑस्ट्रेलिया विरुद्ध भिडणार
- अरबाज खानने मांडलं स्पष्ट मत
- पंतप्रधान नरेंद्र मोदींची एक घोषणा
- थंड डोक्यानं काटा काढला जातोय


# राष्ट्रवादीच्या दोन गटांमध्ये 'खुन्नस'!

## » तुषार कामठे यांच्या वक्तव्याचा समाचार: उपमुख्यमंत्री अजित पवारांनी 'बाप' काढला!

**| पिंपरी | महाईन्यूज**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्ह मिळाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार आज पिंपरी चिंचवड शहराच्या दौऱ्यावर होते. यावेळी एका जाहीर कार्यक्रमात त्यांची जीभ घसरली आहे. त्यांनी शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांचा थेट बाप काढला आहे. त्यामुळे राष्ट्रवादी अजित पवार आणि राष्ट्रवादी शरद पवार गटामध्ये 'खुन्नस' वाढली आहे.**

पिंपरी चिंचवडमध्ये विविध विकास कामांचे लोकार्पण केल्यानंतर ते बोलत होते. मी भल्या सकाळी काम करतो तसं कोणता माय का लाल असं काम करतो ते दाखवा. पण तुमच्याच इथला की दीड शहाणा म्हणतो मी सकाळी सहा वाजता ठेकेदारांची कामं करायला उठतो. त्याला म्हणावं तुझ्या बापाने मला तसं करताना पाहिलं होतं का? राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी काल प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या समोर अजित पवारांवर अशी टीका केली होती. त्याला उत्तर देताना अजित पवारांची अशी जीभ घसरली आहे.




### मा. दादा, तुम्ही इतके का चिडलात?

» सामान्य कुटुंबातील कार्यकर्ता निस्वार्थी भूमिका घेऊ शकतो हे आपणाला आवडले नसेल हे मान्य आहे पण तुम्ही सामान्य कार्यकर्त्यांचा बाप काढणे नक्कीच स्वागतार्ह नाही, अशी खंत तुषार कामठे यांनी व्यक्त केली आहे.

### काय म्हणाले होते तुषार कामठे..?

»"नेहमी अजित पवार म्हणतात पहाटे उठून कामाला लागतो. शहराचा विकास केलाय. त्या अजित पवार यांनी केवळ ठेकेदारांचा आणि त्यांच्या विचारांच्या लोकांचा विकास केलाय. ते पहाटे त्यांना भेटायला जायचे. पिंपरी- चिंचवड शहरात कोणी लक्ष दिलं तर त्यांना आवडत नसायचं. साधा फ्लेक्सवर फोटोवरून ते विचारणा करायचे" असं वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे पिंपरी चिंचवडचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी केले होते.

---

# पाणी पुरवठ्याचे दीर्घकालीन नियोजन!

## » उपमुख्यमंत्री अजित पवार : राज्य सरकारची सर्वोतोपरी तयारी

**पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी |**

**स्थानिक स्वराज्य संस्थांनी नागरिकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि कलाक्षेत्रातही भरीव योगदान द्यावे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. यासोबतच पिंपरी-चिंचवड शहराची २०३२ पर्यंतची लोकसंख्या लक्षात घेऊन पाणी पुरवठ्याचे नियोजन शासनाकडून करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.**



महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या विविध विकासप्रकल्पांचे उद्घाटन, लोकार्पण, भूमिपुजन श्री. पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमांच्या अनुषंगाने सांगवी येथील सार्वजनिक बांधकाम मैदान (पी. डब्लू. डी. मैदान) येथील कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या उद्घाटन समारंभास आमदार आण्णा बनसोडे, उमा खापरे, अश्विनी जगताप, माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर योगेश बहल, मंगला कदम, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी नगरसदस्य बाळासाहेब लांडगे, जगदीश शेट्टी, अजित गव्हाणे, नाना काटे आदी उपस्थित होते.

> "देश जगातील तिसरी अर्थव्यवस्था होण्याच्या काही पाऊले मागे आहे. सध्या देशात वंदे भारत रेल्वे, विमानतळांचे विस्तारीकरण, पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण आदी विकासकामे वेगाने सुरू आहेत. तसेच शासनामार्फत विकसित भारत संकल्प यात्रा यांसारखे विविध उपक्रम राबवून विविध जनकल्याणकारी योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. या योजनांचा लाभ नागरिकांना होत असून मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांची उभारणी केली जात आहे.
>
> **- अजित पवार,**
> उपमुख्यमंत्री

# विद्यापीठाचे अमृतमहोत्सवी वर्ष संपले!

## औचित्याने वर्षभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्याची घोषणा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अमृतमहोत्सवी वर्ष संपूनही वर्षभरातील कार्यक्रमांचे नियोजन कागदावरच राहिले आहे. या वर्षात कार्यक्रम आयोजित करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने वर्षभरातील कार्यक्रमांची रुपरेषा जाहीरच केली नाही. ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट म्हणून गौरवल्या गेलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अमृतमहोत्सवी वर्ष गेल्यावर्षी सुरू झाले. १० फेब्रुवारी रोजी विद्यापीठाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत.**

अमृतमहोत्सवाच्या औचित्याने वर्षभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्याची घोषणा विद्यापीठाकडून करण्यात आली होती. त्यासाठी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेंद्र विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. तसेच वर्षभरात मराठी भाषा भवनाचे काम पूर्ण करणे, संशोधन विकास विभाग स्थापन करणे अशा काही घोषणा करण्यात आल्या होत्या. मात्र वर्षभरात कोणते कार्यक्रम आयोजित केले जाणार याची रुपरेषा समितीकडून वर्ष संपत येऊनही जाहीर करण्यात आली नाही.अमृतमहोत्सवी वर्षातील पहिले सहा महिने विद्यापीठात प्रभारी कारभार सुरू होता. त्यामुळे पहिल्या सहा महिन्यात उल्लेखनीय असे काही घडले नाही. त्यानंतर विद्यापीठाकडून बोधचिन्ह स्पर्धा, नामांकित माजी विद्यार्थ्यांचा सत्कार, अमृतमहोत्सवी उद्यानाची निर्मिती, काही परिषदांचे आयोजन, कविसंमेलन असे काही कार्यक्रम करण्यात आले. मात्र अमृतमहोत्सवी वर्षाच्या औचित्याने नियुक्त केलेल्या समितीने वर्षभरातील कार्यक्रमांचे केलेले नियोजन गुलदस्त्यातच राहिले आहे. “अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मोठे संशोधन प्रकल्प, विद्यार्थी वसतिगृहासह हरित संकुलाची



निर्मिती, नामवंत माजी विद्यार्थी सत्कार, अहमदनगर, नाशिक येथे विशेष व्याख्यानमाला असे विविध कार्यक्रम पुढील वर्षभरात होणार आहेत. त्याबाबतची सविस्तर रुपरेषा लवकरच जाहीर केली जाईल”, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी म्हटले आहे.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अमृतमहोत्सवी वर्षासह विद्यापीठातील जयकर ज्ञानस्रोत केंद्राच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त दुर्मीळ ग्रंथाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. माजी सहायक ग्रंथपाल डॉ. लता गोंडे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठाचा पहिला पदवी प्रदान सोहळा, पहिला वर्धापन दिन, ‘विद्यापीठ वार्ता’चा पहिला अंक, विद्यापीठाचा पहिला वार्षिक अहवाल, पुणे विद्यापीठ कायदा १९४८, विद्यापीठाला भेट दिलेल्या अनेक मान्यवरांची छायाचित्रे, ग. दि. माडगूळकर, पु. ल. देशपांडे, वसंत कानेटकर, ना. धों. महानोर अशा साहित्यिकांच्या हस्ताक्षरातील पत्रे, विद्यापीठाचे पहिले कुलगुरू बॅ. मुकुंद जयकर यांचा वैयक्तिक पुस्तकांचा संग्रह, त्यांना ६ व्या जॉर्जने प्रदान केलेले पदक, केंद्राच्या पहिल्या पाच ग्रंथपालांचे छायाचित्र यांचा प्रदर्शनात समावेश आहे. हे प्रदर्शन १५ फेब्रुवारीपर्यंत खुले राहणार आहे, अशी माहिती जयकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. अपर्णा राजेंद्र यांनी केले आहे.अमृतमहोत्सवाच्या औचित्याने वर्षभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्याची घोषणा विद्यापीठाकडून करण्यात आली होती. त्यासाठी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेंद्र विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती.आयोजित केले जाणार याची रुपरेषा समितीकडून वर्ष संपत येऊनही जाहीर करण्यात आली नाही.अमृतमहोत्सवी वर्षातील पहिले सहा महिने विद्यापीठात प्रभारी कारभार सुरू होता. त्यामुळे पहिल्या सहा महिन्यात उल्लेखनीय असे काही घडले नाही. त्यानंतर विद्यापीठाकडून बोधचिन्ह स्पर्धा, नामांकित माजी विद्यार्थ्यांचा सत्कार, अमृतमहोत्सवी उद्यानाची निर्मिती, काही परिषदांचे आयोजन, कविसंमेलन असे काही कार्यक्रम करण्यात आले. मात्र अमृतमहोत्सवी वर्षाच्या औचित्याने नियुक्त केलेल्या समितीने वर्षभरातील कार्यक्रमांचे केलेले नियोजन गुलदस्त्यातच राहिले आहे. “अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मोठे संशोधन प्रकल्प, विद्यार्थी वसतिगृहासह हरित संकुलाची निर्मिती, नामवंत माजी विद्यार्थी सत्कार, अहमदनगर, नाशिक येथे विशेष व्याख्यानमाला असे विविध कार्यक्रम पुढील वर्षभरात होणार आहेत.

### पहिल्या पाच ग्रंथपालांचे छायाचित्र

» अमृतमहोत्सवी वर्षासह विद्यापीठातील जयकर ज्ञानस्रोत केंद्राच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त दुर्मीळ ग्रंथाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. माजी सहायक ग्रंथपाल डॉ. लता गोंडे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठाचा पहिला पदवी प्रदान सोहळा, पहिला वर्धापन दिन, ‘विद्यापीठ वार्ता’चा पहिला अंक, विद्यापीठाचा पहिला वार्षिक अहवाल, पुणे विद्यापीठ कायदा १९४८, विद्यापीठाला भेट दिलेल्या अनेक मान्यवरांची छायाचित्रे, ग. दि. माडगूळकर, पु. ल. देशपांडे, वसंत कानेटकर, ना. धों. महानोर अशा साहित्यिकांच्या हस्ताक्षरातील पत्रे, विद्यापीठाचे पहिले कुलगुरू बॅ. मुकुंद जयकर यांचा वैयक्तिक पुस्तकांचा संग्रह, त्यांना ६ व्या जॉर्जने प्रदान केलेले पदक, केंद्राच्या पहिल्या पाच ग्रंथपालांचे छायाचित्र यांचा प्रदर्शनात समावेश आहे.

# पुण्यात भाजप कार्यकर्त्यांनी निखिल वागळेंची गाडी फोडली

## निर्भय बनो कार्यक्रमाआधी राडा; भाजपच्या 43 पदाधिकाऱ्यांवर पुणे पोलिसांत गुन्हा

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यात ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्या गाडीवर भाजप कार्यकर्त्यांनी हल्ला केला आहे. त्यांची गाडी फोडली आहे. पुण्यातील डेक्कन भागातील खंडोजी बाबा खोपडे चौकात त्यांच्या गाडीला भाजप कार्यकर्त्यांनी लक्ष्य केले. निखिल वागळे यांची गाडी पोलीस सुरक्षेत दांडेकर पुलानजीक असलेल्या राष्ट्र सेवा दल येथील नियोजित सभास्थळी जात होती. परंतु रस्त्यातच त्यांच्यावर भाजप कार्यकर्त्यांनी हल्ला केला.**

पुण्यातील दांडेकर पुलावरील राष्ट्र सेवा दल येथील हॉलमध्ये आज निर्भय सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेमध्ये ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांचे प्रमुख भाषण होते. त्यांच्याबरोबर ॲड. असीम सरोदे आणि समाजवादी नेते नितीन वैद्य यांचीही भाषणे झाली. मात्र, वागळे यांची सभा झाली तर कायदा सुव्यवस्था बिघडेल, त्यामुळे त्यांची ही सभा होऊ देणार नाही, असा इशारा भाजपने दिला होता.

गाडीवर हल्ला झाल्यानंतरही निखिल वागळे कार्यक्रमस्थळी दाखल झाले. कार्यक्रमस्थळी परिवर्तनवादी कार्यकर्त्यांनी त्यांचे दणक्यात स्वागत केले. निखिल वागळे यांची मंचावर एन्ट्री होताच फुले शाहू आंबेडकरांच्या गगनभेदी घोषणांनी सभास्थळ दणाणून गेलं. काहीही होऊ द्यात आपण सभा घेऊ, असा निर्धार वागळे यांनी बोलून दाखवल्यानंतर जमलेल्या गर्दीने घोषणा देऊन वागळे यांना तुफान प्रतिसाद दिला. निखिल वागळे यांची सायंकाळी ६ वाजता नियोजित सभा होती. परंतु ही सभा होऊ नये, यासाठी भाजपचा तीव्र विरोध होता. निखिल वागळे जेव्हा सभास्थळी जायला निघाले, त्यावेळी त्यांच्या सुरक्षेसाठी पोलीसही होते. परंतु पोलिसांची सुरक्षा असतानाही भाजप कार्यकर्त्यांनी वागळे यांच्या गाडीला दगडांनी लक्ष्य केले.





### जिवंत असेपर्यंत संघर्ष करणार - वागळे

» या सभेला उपस्थित राहिल्यानंतर भाषणात निखिल वागळे म्हणाले की, "आमचा वाहनचालक वैभव आणि राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) प्रशांत जगताप यांच्या कार्यकर्त्यांनी हल्लेखोरांना अंगावर घेतलं, म्हणून आम्ही आज जिवंत आहोत. कारण हल्लेखोरांचा गट आमच्या वाहनावर अक्षरश: चढलं होतं आणि फोडाफोडी केली." "जोपर्यंत आम्ही जिवंत आहोत, तोपर्यंत आम्ही संघर्ष करणार. या भारताचा 'हिंदू पाकिस्तान' होऊ देणार नाही. ही साधी लढाई नाही, ही फॅसिझमविरोधातली लढाई आहे," असंही वागळे म्हणाले. "जोपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज, फुले-शाहू-आंबेडकर आणि सर्व संतांचा आशीर्वाद आहे, तोवर तुम्ही आम्हाला संपवू शकत नाही," असं वागळे म्हणाले.

# महेश लांडगेंनी शब्द खरा केला;

# चिखलीकरांना दिलासा मिळाला!

## वाहतूक सक्षमीकरणासाठी प्रस्तावित रस्त्यांची निविदा

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिखलीतील वाहतूक सक्षम करण्यासासाठी प्रस्तावित रस्ते मार्गी लावण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी दिलेला 'शब्द' अखेर ठरला आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांसह सोसायटीधारकांना दिलासा मिळाला आहे, अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या आहेत.**




पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत १९९९ साली टाळगाव चिखली आणि तळवडे गावचा समावेश झाला आहे. शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून, चिखली-मोशी-चऱ्होली असा सर्वात मोठा 'रेसिडेन्सिअल कॉरिडॉर' विकसित होत आहे. चिखली गावाला ऐतिहासिक वारसा आहे. तसेच, औद्योगिक व निवासी क्षेत्राला जोडणारा प्रमुख दुवा म्हणून चिखलीची ओळख आहे.

तळवडेत आयटी पार्क आणि औद्योगिक पट्टा असल्यामुळे मोठ्या प्रमाणात रहदारी असते. श्री क्षेत्र देहू आणि श्रीक्षेत्र आळंदीला जोडणारा रस्ता चिखलीतून जातो. चाकण औद्योगिक पट्यातून ये-जा करणारे कामगार, कष्टकरी, तळवडे एकआयडी, जाधववाडी भागातील व्यावसिक पट्टा या भागातून मोठ्या प्रमाणात चिखलीतून रहदारी होत असते. त्यामुळे विकास आराखड्यातील प्रस्तावित रस्त्यांना गती द्यावी. या करिता चिखली ग्रामस्थांनी ग्रामसभेमध्ये ठरावही केला होता. त्यानंतर मागण्यांचे निवेदन महापालिका आयुक्तांना दिले होते.

तसेच, भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनाही ग्रामस्थांनी प्रस्तावित रस्ते मार्गी लावण्याबाबत सांकडे घातले होते. त्यानुसार महापालिका प्रशासनाने प्रभाग क्रमांक १ चिखलीमधील देहू आळंदी ते सोनवणे वस्तीकडे जाणारा ३० मीटर रुंद डी.पी. रस्ता, चिखली चौक ते सोनवणेवस्तीकडे जाणारा २४ मीटर रुंद रस्ता आणि इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय ते संतपीठाकडे जाणारा १८ मीटर रुंद डी.पी. रस्त्याच्या कामाची महापालिका स्थापत्य विभागाने सुमारे ६२ कोटी रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे. दि. २७ फेब्रुवारी रोजी निविदा खुली होणार आहे. त्यामुळे मार्च- २०२४ मध्ये कार्यादेश काढला जाईल. तसेच, लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी रस्त्याचे भूमिपूजन होईल, अशी शक्यता आहे.

माजी नगरसेवक कुंदन गायकवाड म्हणाले की, चिखलीचा समावेश महापालिका हद्दीत झाल्यापासून विकासापासून वंचित राहिले होते. २०१७ मध्ये महापालिकेत भाजपाची सत्ता आल्यानंतर खऱ्या अर्थाने या गावातील प्रलंबित विकासकामांना गती मिळाली. स्थानिक नागरिकांनी आमदार महेश लांडगे यांना रस्त्यांची कामे मार्गी लावण्याबाबत मागणी केली होती. त्यावेळी "कोणत्याही परिस्थितीत रस्ते विकासाला प्राधान्य देण्यात येईल.." असा शब्द आमदार लांडगे यांनी दिला होता. तो शब्द आज खरा ठरला आहे.

> "चिखली आणि परिसरातील वाहतूक सक्षम करण्यासाठी प्रस्तावित रस्त्यांची कामे मार्गी लावावीत. यासाठी स्थानिक नागरिक, ग्रामस्थांनी मागणी केली होती. त्यामुळे महापालिका प्रशासन, जिल्हा प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले. आता निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामाला सुरूवात करावी. पर्यायी रस्ते निर्माण झाल्यामुळे चिखली आणि परिसराची 'कनेक्टिव्हीटी' वाढणार आहे. वाहतूक कोंडी कमी होईल आणि वाहनचालक- नागरिकांचा वेळ आणि इंधनाची बचत होईल.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

# ... हा तर काँग्रेसच्या राहुल गांधींचा उद्दामपणा!

## निषेध आंदोलन: ओबीसी समाजाचा अपमान झाल्याचा आरोप

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्म ओबीसीत झाला नसून, गुजरात मधील तेली जातीत झालेला आहे, असा तिरपागडा आरोप करून संपूर्ण ओबीसी समाजाचा अपमान केला असल्याने भाजपच्यातर्फे शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली निषेध आंदोलन करण्यात आले.**



भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा, पिंपरी चिंचवडच्यावतीने पिंपरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात शुक्रवारी, ९ फेब्रुवारी रोजी सकाळी निषेध आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात भाजप माजी जिल्हा अध्यक्ष सदाशिव खाडे, भाजपा वरिष्ठ उपाध्यक्ष व प्रवक्ते राजू दुर्गे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष राजेंद्र राजापूरे, प्रदेश सहसंपर्क प्रमुख मनोज ब्राम्हणकर, महिला शहर अध्यक्षा सुजाता पालांडे, ओबीसी मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होते. प्रसंगी, राहुल गांधी यांच्या निषेधार्थ घोषणा देण्यात आल्या.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्म ओबीसीत झाला नसून, गुजरात मधील तेली जातीत झालेला आहे, गुजरातमध्ये सन २००० मध्ये ओबीसीत आणली असून मोदी यांचा जन्म सामान्य जातीत झाला. त्यांनी जातीनिहाय जनगणनेला (कास्ट सेन्सस) विरोध केला कारण त्यांचे जन्म ओबीसीत झालेला नसून सामान्य जातीत झालेला आहे, असे बेताल व निर्लज्ज उदगार काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी ओरिसातील सभेत काढले, राहुल यांचा हा उद्दामपणा म्हणजे समस्त ओबीसी समाजाचा अपमान आहे, असा आरोप प्रवक्ते राजू दुर्गे यांनी केला.

### ओबीसींमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न...

**मनोज ब्राम्हणकर म्हणाले की, राहुल गांधीच्या मते ओबीसी अंतर्गत अनेक जाती आरक्षणास पात्र नाहीत; कारण त्या सर्व पूर्वी सामान्य वर्गात होत्या. पुन्हा एकदा गांधी परिवार ओबीसी विरोधात षडयंत्र रचत आहे. एखाद्या जातीची ओबीसी विभागणी होण्यापूर्वी ज्या व्यक्तीचा अशा जातींमध्ये जन्म झाला त्यांचे आरक्षण राहुल गांधी काढून घेण्याच्या तयारीत आहे. काँग्रेस तेली समाजाला ओबीसी पासून वेगळे करण्याचा आणि ओबीसींचा एक वर्ग कमकुवत करण्याचा प्रयत्न करीत आहेत.**

# भारतीय गणराज्याच्या निर्मात्या




**‘मी आज इथे उभी आहे आणि मी स्वप्नात हरवले आहे. मला आठवतं, विद्यार्थी असताना मी वाचलं होतं. अमेरिकेच्या संविधान निर्मितीमध्ये हॅमिल्टन, जेफरसन यांनी निर्णायक भूमिका बजावली. मी विचार करायचे की अमेरिकेप्रमाणे गुलामीची अवस्था जाऊन भारताचे स्वतंत्र संविधान लिहिण्याची वेळ केव्हा येईल? मला वाटायचं संविधाननिर्मिती करण्याइतपत आपण सक्षम आहोत का?**



आत्मस्तुती वाटू शकते ही अध्यक्ष महोदय, मात्र मी संविधान निर्मितीत भूमिका बजावू शकले, याचा मला सार्थ अभिमान वाटतो.” दुर्गाबाई देशमुख यांचे १ फेब्रुवारी १९५० चे संसदेच्या पहिल्या अधिवेशनातील हे भाषण. संविधान सभेतल्या आपल्या भूमिकेला ऐतिहासिक महत्त्व आहे, याचे दुर्गाबाईंसारख्या महिला सदस्यांना भान होते. त्यांच्यासह १५ महिलांनी संविधान सभेच्या निर्णय प्रक्रियेत मोलाची भूमिका बजावली.आंध्रच्या दुर्गाबाई देशमुख, बडोद्याच्या हंसा मेहता, केरळच्या पालघाट जिल्ह्यातील अम्मू स्वामीनाथन, कोचिनच्या दाक्षायनी वेलायुधन, पंजाबच्या मलेरकोटला येथील बेगम ऐजाज रसूल, लखनौच्या कमला चौधरी आणि राजकुमारी अमृत कौर, आसाममधील गोलपाडाच्या लीला रॉय, पूर्व बंगालातील म्हणजे (आजच्या बांगलादेशातील) मालती चौधरी, अलाहाबादच्या पूर्णिमा बॅनर्जी आणि विजयालक्ष्मी पंडित, पश्चिम बंगालच्या मालद्यामधील रेणुका रे, हैदराबादच्या सरोजिनी नायडू, हरयाणाच्या अंबाला येथील सुचेता कृपलानी, केरळच्या तिरुवअनंतपुरम येथील ॲनी मस्कारे अशा या पंधरा महिला सदस्य. पितृसत्ताक समाजात आणि संविधानसभेत आपली भूमिका ठामपणे मांडणे सोपे नव्हते. मात्र या महिलांनी आपली जबाबदारी चोख पार पाडली.

या सर्व महिलांचे प्रतिनिधित्व केवळ नाममात्र नव्हते तर त्यांनी मौलिक सूचना करत भरीव काम केले. उदाहरणार्थ, रेणुका रे यांनी संपत्तीच्या हक्कांविषयी आक्षेप नोंदवला तेव्हा संविधान सभेतल्या पुरुषांनी त्यांची कुचेष्टा करण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांनी ठामपणे मुद्दे मांडले. अगदी दाक्षायनी वेलायुधन यांनी जसा दलित असून दलितांकरिता स्वतंत्र मतदारसंघांना विरोध केला त्याच प्रमाणे संविधान सभेतील बेगम ऐजाज रसूल यांनीही मुस्लीम लीगच्या प्रतिनिधी असूनही मुस्लिमांकरिता स्वतंत्र मतदारसंघ असू नयेत, अशी भूमिका मांडली. अम्मू स्वामीनाथन यांनी स्वातंत्र्य आंदोलनात आणि संविधान सभेतही भरीव योगदान दिले. पुढे त्यांचा गौरव १९७५ साली आंतरराष्ट्रीय महिला वर्षात ‘मदर ऑफ द इयर’ या किताबाने झाला. राजकुमारी अमृत कौर यांनी मतदानाचा हक्क सर्वांना असायला हवा, अशी आग्रही मागणी केली, भाषा-शिक्षण या मुद्द्यावर त्यांनी सूचना केल्या तर पुढे आरोग्याच्या क्षेत्रात पायाभूत बदलही त्यांनी केले. देशाच्या पहिल्या आरोग्यमंत्री म्हणून त्यांनी काम केले. ‘भारताची नाइटिंगेल’ असे ज्यांना संबोधले गेले त्या सरोजिनी नायडू यांनी स्त्रीवादी जाणीव विकसित व्हावी म्हणून प्रयत्न केले.हंसा मेहता यांच्यासारख्या संविधान सभेतल्या सदस्य तर पुढे संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कांच्या परिषदेसाठी भारताच्या प्रतिनिधी म्हणून गेल्या. संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यातील पहिले कलम होते,‘ऑल मेन आर बॉर्न फ्री ॲण्ड इक्वल’. हंसा मेहता यांच्यामुळे ‘मेन’ शब्दाऐवजी ‘ह्युमन बिइंग’ असे शब्द वापरले गेले. सर्वांना सामावून घेणाऱ्या या दुरुस्तीचे श्रेय हंसा मेहता यांचे आहे. जगभरातल्या अनेक देशांमध्ये महिलांना मतदानाचा हक्कही नव्हता त्या काळात भारतातील महिला आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे प्रतिनिधित्व करत होत्या कारण नेहरूंची आधुनिक दृष्टी. ‘फाउंडिंग मदर्स ऑफ द इंडियन रिपब्लिक’ (२०२३) या अच्युत चेतन यांच्या पुस्तकात महिला सदस्यांनी संविधान सभेत बजावलेल्या भूमिकेचे विश्लेषण आहे. महिला सदस्यांच्या संविधान निर्मितीतील कार्याची यथोचित नोंद जरुरीची आहे कारण या स्त्रिया भारतीय गणराज्याच्या निर्मात्या आहेत!हंसा मेहता यांच्यामुळे ‘मेन’ शब्दाऐवजी ‘ह्युमन बिइंग’ असे शब्द वापरले गेले. सर्वांना सामावून घेणाऱ्या या दुरुस्तीचे श्रेय हंसा मेहता यांचे आहे.

## संपादकीय »

### ‘अंक’ माझा वेगळा?

***कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांस राज्यासाठी केंद्राकडून अधिक महसूल-वाटा हवा आहे.***

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांस राज्यासाठी केंद्राकडून अधिक महसूल-वाटा हवा आहे. तशी मागणी करण्यासाठी ते दिल्लीत धडकले तर त्याची संभावना अर्थमंत्र्यांनी खोटारडे अशी केली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सिद्धरामय्या यांच्या पक्षावर उत्तर-दक्षिण भेदभाव निर्माण करीत असल्याचा आरोप केला. पंतप्रधान म्हणून मोदी यांच्या भूमिकेविषयी सहानुभूती. याचे कारण गुजरातच्या मुख्यमंत्रीपदी असताना नरेंद्र मोदी यांनी केंद्राविषयी असाच एल्गार वारंवार केला होता आणि केंद्र हे गुजरातवर अन्याय करते असे त्यांचे तेव्हा म्हणणे होते. तेव्हा अहमदाबादेतून दिसणारा भारत हा दिल्लीतून दिसणाऱ्या भारतापेक्षा वेगळा असू शकतो हे आपण लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे मुख्यमंत्रीपदी असतानाची भूमिका पंतप्रधानपदी गेल्यावर बदलू शकते हे सत्यही लक्षात येईल. हे सत्य लक्षात घेतल्यानंतर आता सिद्धरामय्या यांच्या तक्रारीविषयी.

**काही कर भरण्यास मुदतवाढ, परदेश-सहलींवरच्या कराचा जाच अखेर अधिकृतपणे संपवणे असे काही स्वागतार्ह भाग यंदा अर्थमंत्र्यांच्या भाषणात होते हे खरेच, अंतरिम अर्थसंकल्पामध्ये महत्त्वाचे करप्रस्ताव, करसवलती व धोरणात्मक घोषणा नसाव्यात असा सर्वसाधारण संकेत आहे.**

# विवादित करकमा निर्लेखित करण्याची घोषणा




२०१९ च्या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये मात्र करविषयक अनेक प्रस्तावांचा व सवलतींचा समावेश होता. त्यामुळे २०१९ हा अपवाद होता, की आता त्यामुळे नवीन पायंडा पडला आहे, याबाबतचे औत्सुक्य यंदाच्या अंतरिम अर्थसंकल्पाच्या वेळी नक्कीच होते. १० जानेवारीपर्यंत अर्थसंकल्पाबाबत सूचना/ अपेक्षा लेखी स्वरूपात पाठवण्याचे आवाहनसुद्धा केंद्र सरकारकडून करण्यात आले होते. त्यामुळे सदर औत्सुक्य आणखीच वाढले होते. व्यावसायिक संस्थांकडून व व्यक्तिश:सुद्धा, अनेक करविषयक लेखी सूचना व अपेक्षा पाठवल्या गेल्या होत्या. त्या किती होत्या व काय स्वरूपाच्या होत्या याचे संकलित तपशील जाहीर केले गेलेले नाहीत. अशा प्रकारे सूचना वगैरे मागवलेल्या असताना, केंद्रीय अर्थमंत्र्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात कर प्रस्तावांबाबत उल्लेख करताना, सुरुवातीलाच जाहीर केले की अंतरिम अर्थसंकल्पांबाबतच्या परंपरांचा विचार करता, त्या यावेळी कुठलेही करविषयक नवे बदल प्रस्तावित करणार नाहीत. प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर यांचे दरदेखील सध्या आहेत तसेच राहतील. अनेकांना हा उल्लेख काहीसा अनपेक्षित भासला. अर्थात, खरे तर तो एक आदर्श आणि कौतुकास्पद पवित्रा आहे. त्यामुळे या १ फेब्रुवारीला अत्यल्प असे करप्रस्ताव असलेले वित्तविधेयक सादर केले गेले आहे.त्या प्रस्तावांचा, आणि अर्थसंकल्पीय भाषणातील व दस्तऐवजांतील करविषयक मजकुरांचा थोडक्यात गोषवारा मांडायचा झाला तर तो खालीलप्रमाणे आहे : (१) आयकर कायद्यात बदल सुचवणारे एकूण आठच परिच्छेद वित्त विधेयकात आहेत. त्यांतील बरेचसे प्रस्ताव हे आंतरराष्ट्रीय आर्थिक सेवा केंद्रासंबंधित घटक संस्था, सॉव्हरीन वेल्थ फंड्स / पेन्शन फंड्स, परदेशात असलेल्या नातलगांना शिक्षण / वैद्यकीय / अन्य हेतूंसाठी भारतातून पाठवायच्या रकमा व परदेश सहलींसाठी द्यावयाच्या रकमा यांच्यावरील करसंकलनाचे दर, यासंबंधी आहेत व एखाद-दोन घोषणा या देशातील करदाते (स्टार्ट-अप्स इत्यादी) यांच्यासाठीच्या आहेत. या सगळ्यांतच प्रामुख्याने निरनिराळ्या मुदतवाढींचे प्रस्ताव आहेत. म्हणजे, काही विशिष्ट करदात्यांच्या बाबतीत काही विशिष्ट गोष्टींची पूर्तता करण्यासाठी जिथे ३१ मार्च २०२४ ही अंतिम तारीख होती, तिथे आणखी एक वर्षांची वाढीव मुदत दिली गेली आहे. (२) आयकराच्या बाबतीत सरकार दफ्तरी असे दिसत आहे की, अनेक करदात्यांकडून अनेक छोट्या मोठ्या करकमा या बऱ्याच वर्षांपूर्वीपासून येणे बाकी आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# थंड डोक्यानं काटा काढला जातोय!

## राजकारण्यांमुळे एका महिन्यातच महाराष्ट्राचा 'गँग्ज ऑफ वासेपूर'

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**जेमतेम महिना झालाय आणि या एका महिन्यात महाराष्ट्राचा वासेपूर झालाय, काळाकुट्ट वासेपूर. जिथे मरणाचे भय आहे, जिथे बदल्याची आग आहे, त्या आगीत होरपळलेली माणसं आहेत, त्या आवाजाने भेदरलेली जनताही आहे. कधी कुठून गोळी येईल आणि रक्ताचे पाट वाहतील हे माहित नाही. आतापर्यंत असे सीन आपण फिल्ममध्येच पाहिले आहेत, पण आता हे वास्तवातही घडतंय. अगदी गँग्ज ऑफ वासेपूर चित्रपटाप्रमाणे महाराष्ट्रात स्थिती असल्याचं चित्र आहे.**



थंड डोक्यानं, अगदी थंड डोक्यानं केलेले प्लॅन, कुणाला शंकाही येणार नाही असं प्लॅनिंग. महाराष्ट्रात उण्यापुऱ्या एका महिन्यात झालेल्या तीन घटनांमध्येही असंच प्लॅनिंग होतं. शरद मोहोळला (Sharad Mohol) संपवण्याआधी विरोधी गटातल्या माणसांनी त्याचा विश्वास संपादित केला आणि त्याच्याच गँगमध्ये सामील होऊन एके दिवशी त्याचा काटा काढला. अभिषेक घोसाळकरांना (Abhishek Ghosalkar) संपवतानाही मॉरीसनं कंप्लिट फुलप्रूफ प्लॅनिंग केलं. ज्याने जेलमध्ये धाडलं, त्याच घोसळकरांशी मैत्री केली. त्यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छांचे फलक लावले. सार्वजनिक मंचावरुन आपल्यातलं वैर संपल्याचं जाहीर केलं आणि फेसबुक लाईव्हला बोलावलं. फेसबुक लाईव्ह संपत असतानाच पाच गोळ्या घातल्या आणि दीड वर्षापासून मनात पेटत असलेल्या 'बदला'च्या तगमगीला वाट मोकळी करून दिली. पण मुद्दा असा आहे की इतका क्रोध, पराकोटीचा तिरस्कार, धगधगणारी बदल्याची भावना निर्माण होते कशी? आणि आर किंवा पार करण्याची मनाची तयारी होते कशी? येता जाता सहज गोळ्या घालणे. कुठेही, कधीही, कसेही, मुडदे पाडणे हे फक्त सिनेमात किंवा यूपी-बिहारमध्ये होत असतं अशी धारणा होती. पण पडद्यावरचा हा रक्तपात आता आपल्या घरांशेजारी आला आहे. त्यातून बदल्याच्या आगीत धगधगणारी माणसं कदाचित इन्स्पायरही होतील. त्यामुळे बदल्याच्या या आगीचा महाराष्ट्रात वणवा होणार नाही इतकीच अपेक्षा आहे.महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून घडणाऱ्या घटनांमुळे राज्यात कायद्याचं राज्य राहिलंय का नाही असा प्रश्न पडतोय. जिकडे तिकडे नुसती गुन्हेगारी फोफावतेय. एकेकाळी मुंबई पोलीस हे नाव ऐकूण गँगस्टर्स बिळात लपून बसायचे. पण तशी परिस्थिती आता राहिली नसल्याचं दिसून येतंय. आधी कायद्याचा धाकच इतका होता की कोणताही गुन्हा करताना गुन्हेगार दहा वेळ विचार करायचा. आता तसं काहीच राहिलं नाही हे वास्तव आहे. राजकारणाचं गुन्हेगारीकरण आणि गुन्हेगारांचे राजकारण्यांसोबतचे संबंध, यामुळे राजकीय गुन्हेगारांना काहीच भीती उरली नाही. त्यातून मग सत्ताधारी पक्षाचा एक आमदार सहकारी पक्षाच्या नेत्याला थेट पोलीस स्टेशनमध्येच गोळ्या घालतो. राज्यात एकामागून एक गुन्हे होत घडत असताना, राज्याची तुलना यूपी बिहारशी होत असताना सत्ताधारी मात्र तेवढेच सुस्त असल्याचं दिसून येतंय.

### सत्ताधारी बेजबाबदार?

ते करणार तरी काय, कारण सत्तेत बसलेल्या लोकांशी संबंधित लोकच उघड गुन्हे करताना दिसत आहेत. त्यातून मग अजित पवार म्हणतात की, महेश गायकवाड यांच्याकडेही पिस्तुल होतं, त्यांनी ते चालवलं असतं तर अनर्थ घडलं असतं. तर दुसरीकडे राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की, वैयक्तिक वादातून या घटना घडत आहेत, उद्या गाडीखाली श्वान आलं तरी विरोधी पक्ष राजीनामा मागतील. प्रश्न हा वैयक्तिक वादाचा आणि राजकारणाचा नाही तर राज्यातील घसरत्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या स्थितीचा आहे. त्यामुळे सर्वच राज्यकारण्यांच्या बेजाबदार वागण्यामुळे महाराष्ट्राचा गँग्ज ऑफ वासेपूर झालाय हेच म्हणावं लागेल. जेमतेम महिना झालाय आणि या एका महिन्यात महाराष्ट्राचा वासेपूर झालाय, काळाकुट्ट वासेपूर. जिथे मरणाचे भय आहे, जिथे बदल्याची आग आहे, त्या आगीत होरपळलेली माणसं आहेत, त्या आवाजाने भेदरलेली जनताही आहे. कधी कुठून गोळी येईल आणि रक्ताचे पाट वाहतील हे माहित नाही. आतापर्यंत असे सीन आपण फिल्ममध्येच पाहिले आहेत, पण आता हे वास्तवातही घडतंय. अगदी गँग्ज ऑफ वासेपूर चित्रपटाप्रमाणे महाराष्ट्रात स्थिती असल्याचं चित्र आहे. थंड डोक्यानं, अगदी थंड डोक्यानं केलेले प्लॅन, कुणाला शंकाही येणार नाही असं प्लॅनिंग. महाराष्ट्रात उण्यापुऱ्या एका महिन्यात झालेल्या तीन घटनांमध्येही असंच प्लॅनिंग होतं.

# प्रकल्पांना विरोध करण्याकरता 'आंदोलनजीवी समाज' तयार

## रिफायनरीचा उल्लेख करत फडणवीसांचा विरोधकांना टोला

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रत्येक प्रकल्पाला विरोध करण्याकरता एक समाज तयार झाला आहे, या समाजाला देवेंद्र फडणवीसांनी आंदोलनजीवी असं म्हटलं आहे. ते आज दिल्लीत सुशासन महोत्सव २०२४ उद्घाटन समारंभ – सुशासन आणि नवोपक्रमाचा राष्ट्रीय उत्सव कार्यक्रमात बोलत होते.**




"आमच्या प्रकल्पांना विरोध का असतो? सरकारसमोर विश्वासाबाबत खूप मोठं संकटआहे. सरकार तुमची जागा घेईल, त्याबदल्यात तुम्हाला काहीच देणार नाही, असं पूर्वपार लोकांच्या मनात बिंबवलं गेलं आहे. आणि हे खरंही आहे. कारण लोकांनी हे पूर्वी पाहिलं आहे. जेव्हा तुम्ही प्रकल्प करता, तेव्हा तुम्ही लोकांशी संवाद साधता. प्रत्येक प्रकल्पात अडचणी असतात. प्रत्येक प्रकल्पात प्रकल्पबाधित असतात. पण अशा लोकांबरोबर आम्ही संवाद साधला. आम्ही काय करू इच्छित आहोत, यातून त्यांचं कसं भलं होणार आहे हे आम्ही या संवादातून जनतेला सांगतो. या सर्वांमध्ये पारदर्शकता फार महत्त्वाची असते", असं देवेंद्र फडणवीस म्हणाले."लोकांसमोर तुम्ही पारदर्शकता ठेवली पाहिजे. आम्ही कोकणात रिफायनरी करणार होतो. पण आम्हाला उद्धव ठाकरेंनी प्रचंड विरोध केला. या विरोधाला आम्हाला थांबवावं लागलं. त्यांच्याविरोधात जाऊन १० हजार लोकांनी आम्हाला पत्र पाठवली की आम्ही जागा देण्यास तयार आहोत. परंतु, त्यांचं सरकार आल्याने तो प्रकल्प रखडला", असं देवेंद्र फडणवीस म्हणाले."आपल्या पंतप्रधानांनी नवी व्याख्या दिली आहे की आंदोलनजीवी. या प्रकल्पात आंदोलनजीवी दिसले. अनेक पक्ष आणि अनेक लोक आंदोलनजीवी आहेत. एक असा समाज तयार झाला की तो प्रत्येक प्रकल्पाला विरोध करतो. प्रत्येक प्रकल्पात एकाच प्रकारचे लोक विरोध करत होते. त्यांना एकाच ठिकाणाहून पैसा येत आहे. एकप्रकारे आमच्या देशात विकासाचा विरोध करण्यासाठी एक इको सिस्टिम तयार करण्यात आली आहे. या इको सिस्टिमला तोडावं लागतं", असं म्हणत देवेंद्र फडणवीसांनी विरोधकांवर निशाणा साधला.

### लोकांसमोर तुम्ही पारदर्शकता ठेवली

"आमच्या प्रकल्पांना विरोध का असतो? सरकारसमोर विश्वासाबाबत खूप मोठं संकटआहे. सरकार तुमची जागा घेईल, त्याबदल्यात तुम्हाला काहीच देणार नाही, असं पूर्वपार लोकांच्या मनात बिंबवलं गेलं आहे. आणि हे खरंही आहे. कारण लोकांनी हे पूर्वी पाहिलं आहे. जेव्हा तुम्ही प्रकल्प करता, तेव्हा तुम्ही लोकांशी संवाद साधता. प्रत्येक प्रकल्पात अडचणी असतात. प्रत्येक प्रकल्पात प्रकल्पबाधित असतात. पण अशा लोकांबरोबर आम्ही संवाद साधला. आम्ही काय करू इच्छित आहोत, यातून त्यांचं कसं भलं होणार आहे हे आम्ही या संवादातून जनतेला सांगतो. या सर्वांमध्ये पारदर्शकता फार महत्त्वाची असते", असं देवेंद्र फडणवीस म्हणाले."लोकांसमोर तुम्ही पारदर्शकता ठेवली पाहिजे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींची एक घोषणा!

## आघाडीतला मोठा पक्ष भाजपाबरोबर; एनडीएचं बळ वाढलं?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राष्ट्रीय लोक दलाचे प्रमुख जयंत चौधरी हे एनडीएत सहभागी होणार असल्याच्या वृत्तांवर शिक्कामोर्तब झाल्याचं बोललं जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही वेळापूर्वी जयंत चौधरी यांचे आजोबा आणि भारताचे माजी पंतप्रधान दिवंगत चौधरी चरण सिंह यांना भारत रत्न दिला जाणार असल्याची घोषणा केली आहे. सरकारच्या या घोषणेनंतर रालोद प्रमुख जयंत चौधरी भावूक झाले. या पुरस्काराबद्दल जयंत चौधरी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. रालोद सध्या समाजवादी पक्षाबरोबर आणि पर्यायाने इंडिया आघाडीबरोबर आहे. परंतु, गेल्या काही दिसांपासून ते भाजपाबरोबर घरोबा करतील आणि एनडीएत सहभागी होतील, अशा बातम्या येत होत्या. त्याबाबत विचारल्यावर जयंत चौधरी म्हणाले, आता कुठल्या तोंडाने मी नकार देऊ?**




जयंत चौधरी म्हणाले, आज देशासाठी खूप महत्त्वाचा आणि मोठा दिवस आहे. मी खूप भावूक झालो आहे. या पुरस्काराबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे आभार मानतो. आपल्या पंतप्रधानांनी देशाची नस ओळखली आहे. देशात सर्व वर्गांतील लोकांचा, शेतकरी आणि कष्टकऱ्यांचा सन्मान केला जात आहे. दुसऱ्या कुठल्याही सरकारमध्ये असं काहीतरी करुन दाखवण्याची क्षमता नव्हती. मला आज माझे वडील अजित सिंह यांची खूप आठवण येतेय. युतीत आम्हाला किती जागा मिळतील याकडे मी लक्ष देणार नाही, तुम्हीही (प्रसारमाध्यमं) या गोष्टीकडे लक्ष देऊ नका. मी कुठल्या तोंडाने तो प्रस्ताव नाकारू? मी समाजमाध्यमांवरील माझी कुठलीही पोस्ट डिलीट करणार नाही. जशी राजकीय परिस्थिती असेल त्यानुसार मी माझं मत मांडत राहीन.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार भाजपा आणि रालोदची युती पक्की झाली आहे. केवळ त्याबाबतची अधिकृत घोषणा होणं बाकी आहे. रालोद हा पक्ष उत्तर प्रदेशात लोकसभेच्या दोन जागा लढवू शकतो. त्याचबरोबर रालोदला राज्यसभेची एक जागा दिली जाऊ शकते. पुढच्या दोन ते तीन दिवसांमध्ये दोन्ही पक्षांच्या युतीची घोषणा होऊ शकते. इंडिया आघाडीतले पक्ष सातत्याने दावा करत होते की, जयंत चौधरी यांचा राष्ट्रीय लोक दल हा पक्ष त्यांच्या आघाडीचाच एक भाग आहे. जयंत चौधरी इंडिया आघाडी सोडून कुठेही जाणार नाहीत. आम्ही सर्व पक्ष मिळून आगामी लोकसभा निवडणूक एकत्रितपणे लढणार आहोत. इंडिया आघाडीतल्या नेत्यांच्या वक्तव्यांबाबत प्रश्न विचारल्यावर जयंत चौधरी यांनी मौन बाळगलं.

जाता जाता जयंत चौधरी म्हणाले, मी माझे दोन्ही बाजूचे दरवाजे उघडे ठेवले आहेत.काँग्रेसचे नेते आणि भारताचे माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार जाहीर करत असल्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज (९ फेब्रुवारी) एक्स अकाऊंटवरून केली. त्यांच्यासह माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंह आणि कृषी क्षेत्रात क्रांती घडविणारे डॉ. एम. एस. स्मामीनाथन यांनाही भारतरत्न पुरस्कार जाहीर केल्याची घोषणा पंतप्रधान मोदी यांनी केली. नरसिंह राव यांच्याबद्दल भावना व्यक्त करताना मोदी म्हणाले, माजी पंतप्रधान नरसिंह राव यांना भारतरत्न पुरस्काराची घोषणा करताना मला आनंद वाटत आहे.माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंह यांच्याबद्दल माहिती देताना पंतप्रधान नरेंद्रो मोदी म्हणाले, "चौधरी चरण सिंह यांनी दिलेल्या अतुलनीय योगदानाला हा पुरस्कार समर्पित करत आहोत. त्यांनी शेतकऱ्यांचे अधिकार आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आपले पूर्ण आयुष्य वेचले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री असो किंवा देशाचे गृहमंत्री किंवा साधे आमदार असतानाही त्यांनी केवळ राष्ट्र निर्माणाला महत्त्व दिले. आणीबाणीच्या विरोधातही त्यांनी ठाम भूमिका घेतली होती. आमच्या शेतकरी बांधवांसाठी त्यांची समर्पण वृत्ती आणि आणीबाणीच्या काळात त्यांनी लोकशाही वाचविण्यासाठी दाखविलेली तत्परता आम्हाला कायम प्रेरणा देत राहिल.जयंत चौधरी म्हणाले, आज देशासाठी खूप महत्त्वाचा आणि मोठा दिवस आहे. मी खूप भावूक झालो आहे. या पुरस्काराबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे आभार मानतो. आपल्या पंतप्रधानांनी देशाची नस ओळखली आहे. देशात सर्व वर्गांतील लोकांचा, शेतकरी आणि कष्टकऱ्यांचा सन्मान केला जात आहे. दुसऱ्या कुठल्याही सरकारमध्ये असं काहीतरी करुन दाखवण्याची क्षमता नव्हती.

### अजित सिंह यांची खूप आठवण येतेय

» मला आज माझे वडील अजित सिंह यांची खूप आठवण येतेय. युतीत आम्हाला किती जागा मिळतील याकडे मी लक्ष देणार नाही, तुम्हीही (प्रसारमाध्यमं) या गोष्टीकडे लक्ष देऊ नका. मी कुठल्या तोंडाने तो प्रस्ताव नाकारू? मी समाजमाध्यमांवरील माझी कुठलीही पोस्ट डिलीट करणार नाही. जशी राजकीय परिस्थिती असेल त्यानुसार मी माझं मत मांडत राहीन.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार भाजपा आणि रालोदची युती पक्की झाली आहे. केवळ त्याबाबतची अधिकृत घोषणा होणं बाकी आहे. रालोद हा पक्ष उत्तर प्रदेशात लोकसभेच्या दोन जागा लढवू शकतो. त्याचबरोबर रालोदला राज्यसभेची एक जागा दिली जाऊ शकते. पुढच्या दोन ते तीन दिवसांमध्ये दोन्ही पक्षांच्या युतीची घोषणा होऊ शकते. इंडिया आघाडीतले पक्ष सातत्याने दावा करत होते की, जयंत चौधरी यांचा राष्ट्रीय लोक दल हा पक्ष त्यांच्या आघाडीचाच एक भाग आहे. पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार जाहीर करत असल्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज (९ फेब्रुवारी) एक्स अकाऊंटवरून केली. त्यांच्यासह माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंह आणि कृषी क्षेत्रात क्रांती घडविणारे डॉ. एम. एस. स्मामीनाथन यांनाही भारतरत्न पुरस्कार जाहीर केल्याची घोषणा पंतप्रधान मोदी यांनी केली.

# ज्ञानवापी प्रकरणी 'जेल भरो' आंदोलनाची हाक..!

## मौलवी तौकिर रजा यांच्या अटकेच्या विरोधात निदर्शन

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उत्तर प्रदेशच्या बरेलीमधील इत्तेहाद-ए-मिल्लत परिषदेचे मौलवी तौकिर रजा खान यांनी शुक्रवारी जेल भरो आंदोलनाची हाक दिल्यानंतर तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. तौकिर रजा खान यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत मोठा जनसमुदाय रस्त्यावर उतरला. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात राहावी, यासाठी मोठा फौजफाटा तैनात केला आहे.**



तौकिर रजा यांना ताब्यात घेतले आहे. काही दिवसांपूर्वी ज्ञानवापी मशिदीबाबतचा निकाल वाराणसी न्यायालयाने दिला होता. त्या निकालानंतर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केलेल्या आवाहनाचा विरोध करत तौकिर रजा खान यांनी जेल भरोची घोषणा केली.मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काही दिवसांपूर्वी विधानसभेत बोलत असताना वाराणसी मधील ज्ञानवापी मशीद आणि मथुरामधील शाही इद्गाह दर्ग्यावरील हक्क मुस्लीम समुदायाने सोडून द्यावा, असे आवाहन केले होते. या आवाहनाला तौकिर रजा खान यांनी विरोध केला होता. कायदा व सुव्यवस्था नियंत्रणार राखण्यासाठी १,००० पोलिसांना तैनात केले आहे. बरेलीमधील सर्व महत्त्वाच्या भागावर चौक्या उभारण्यात आलेल्या आहेत. परिस्थिती हाताळण्यासाठी सहा अतिरिक्त पोलीस अधिक्षक आणि १२ प्रांत अधिकारी नेमण्यात आले आहेत.तौकिर रजा यांनी कालच उत्तराखंडमधीर हिंसेवर वादग्रस्त विधान केले होते. ते म्हणाले की, तुम्ही आमच्या घरावर बुलडोजर चालवणार असाल तर आम्ही गप्प बसायचे का? आता आम्ही कोणत्याही बुलडोजरला सहन करणार नाही. जर सर्वोच्च न्यायालय आमची दखल घ्यायला तयार नसेल तर आम्हाला स्वतःचे संरक्षण करण्याची जबाबदारी घ्यावी लागेल. जर कुणी आरोपी असेल तर त्याच्या घरावर, मदरशा किंवा मशीदीवर बुलडोजर चालविण्याचे कारण काय?

### आवाहनाला मोठा प्रतिसाद

» आम्ही याचा विरोध करणार. देशात द्वेषाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. याविरोधात आम्ही बरेलीमधून अभियान सुरू करत आहोत.उत्तर प्रदेशच्या बरेलीमधील इत्तेहाद-ए-मिल्लत परिषदेचे मौलवी तौकिर रजा खान यांनी शुक्रवारी जेल भरो आंदोलनाची हाक दिल्यानंतर तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. तौकिर रजा खान यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत मोठा जनसमुदाय रस्त्यावर उतरला. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात राहावी, यासाठी मोठा फौजफाटा तैनात केला आहे. त्या निकालानंतर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केलेल्या आवाहनाचा विरोध करत तौकिर रजा खान यांनी जेल भरोची घोषणा केली.

# एक 'शाही मोहल्ला' की वेश्या व्यवसायाचं केंद्रस्थान?

चित्रपटाच्या माध्यमातून एखादा काळ उभा करणं ही काही सोप्पी गोष्ट नाही. हॉलिवूडमध्ये स्टीवन स्पीलबर्ग हे दिग्दर्शक यात माहिर आहे हे आपल्या सगळ्यांनाच ठाऊक आहे. १९७५ साली आलेला शार्क माशावर बेतलेला 'JAWS' हा चित्रपट असो किंवा १९९३ साली आलेला ज्यू नरसंहारावर बेतलेला 'SCHINDLER'S LIST' असो, 'ज्यूरासिक पार्क'सारखा अविस्मरणीय अनुभव देणारी सीरिज असो किंवा 'SAVING PRIVATE RYAN' व 'BRIDGE OF SPIES'सारखे युद्ध व त्याच्या पार्श्वभूमीवर बेतलेले चित्रपट असो. स्पीलबर्ग यांचे चित्रपट प्रेक्षकांना त्या काळात खेचून घेऊन जातात इतकं त्यांनी त्यातील बारकावे आणि छोट्या छोट्या गोष्टींवर मेहनत घेतलेली असते. भारतीय चित्रपटसृष्टीतसुद्धा के आसिफसारखे दिग्दर्शक होऊन गेले पण त्यानंतर ही गोष्ट फारशी कुणालाजमलेली नाही, परंतु एक दिग्दर्शक आहे ज्याला भारतीय चित्रपटसृष्टीचा स्पीलबर्ग म्हंटलं तरी अतिशयोक्ति ठरणार नाही, ते म्हणजे संजय लीला भन्साळी!आपल्या लांबलचक फिल्मी करिअरमध्ये केवळ १० चित्रपटच दिग्दर्शित करणाऱ्या संजय लीला भन्साळी यांना स्पीलबर्गच्या बरोबर नेऊन बसवण्यामागील एकमात्र कारण ते म्हणजे त्यांचा



दृष्टिकोन. त्यांच्या लेन्समधून दिसणारं कथानकातलं विश्व अन् सादरीकरण हे प्रेक्षकांना खेचून त्या काळात घेऊन जातं. मग तो 'हम दिल दे चुके सनम'सारखा प्रेमाचा त्रिकोण असो, 'देवदास'सारख्या अजरामर कलाकृतीचं भव्य पद्धतीने भव्य पद्धतीने सादरीकरण असो, 'ब्लॅक'सारख्या चित्रपटातून एका गंभीर समस्येवर भाष्य करणं असो, 'पद्मावत', 'बाजीराव मस्तानी'सारखे ऐतिहासिक विषय हाताळणे असो किंवा 'गंगूबाई काठियावाडी' सारखा कमर्शियल बायोपिक असो. या प्रत्येक चित्रपटात जो काळ भन्साळी यांनी उभा केला आहे त्यात प्रेक्षक अक्षरशः हरवून जातो. चित्रपटविश्वात दमदार काम केल्यावर आता भन्साळी हे ओटीटीवर दणक्यात एंट्री करणार आहे. असाच एक भव्यदिव्य विषय भन्साळी नेतफ्लिक्स सीरिजच्या माध्यमातून आपल्यासमोर घेऊन येत आहेत ज्याचं नाव आहे 'हीरामंडी'. गेली २ वर्षं भन्साळी यांच्या या प्रोजेक्टबद्दल मनोरंजनविश्वात प्रचंड चर्चा होती.

## अरबाज खानने मांडलं स्पष्ट मत

अभिनेता अरबाज खानने दीड महिन्यांपूर्वी मेकअप आर्टिस्ट शुरा खानशी दुसरं लग्न केलं. पण तिच्याशी लग्न करण्याचा निर्णय अचान घेतला नव्हता, असा खुलासा त्याने केलाय. तसेच तो शुरासह डेटिंग करतोय, याची घरात कुणालाच माहिती नव्हती. लग्नाचा निर्णय घेतल्यानंतर घरी सांगितलं आणि त्यांच्याकडून नात्याला पाठिंबा मिळाला, असं अरबाज म्हणाला. 'इंडियन एक्स्प्रेस' ला दिलेल्या मुलाखतीत त्याने त्याच्या व शुराच्या वयातील अंतराबाबतही भाष्य केलं.अरबाजचे पालक सलीम आणि सलमा खान, भाऊ सलमान व सोहेल आणि बहिणी अलविरा व अर्पिता खान यांना माहित नव्हतं की तो शुराला डेट करत आहे. "सुरुवातीला त्यांना माहित नव्हतं. मी कोणालातरी भेटत आहे, याची कल्पना त्यांना होती पण जेव्हा त्यांना समजलं की मी लग्न करत आहे.

## रिचानेही दिली गुडन्यूज

रिचा चड्ढा आणि अली फजल ही बॉलीवूडमधील लोकप्रिय जोडी आहे. नोंदणी पद्धतीने लग्न करून अडीच वर्षांनंतर दोघांनी त्यांच्या मित्र आणि नातेवाईकांच्या उपस्थितीत लग्नगाठ बांधली होती. २०२२ मध्ये लग्न करणाऱ्या या जोडप्याने आता गुडन्यूज दिली आहे. अली व रिचा लवकरच पालक होणार आहेत.यामी गौतम आई होणार असल्याची बातमी नुकतीच समोर आली असून आता रिचा चड्ढा आणि अली फजल हे जोडपं लवकरच आई बाबा होणार असल्याचं समोर आलंय. याबाबत दोघांनीही त्यांच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर अनोख्या पद्धतीने पोस्ट शेअर केली आहे.शुक्रवारी रिचा आणि अलीने त्यांच्या इन्स्टाग्रामवर एकत्रित पोस्ट शेअर केली. पहिल्या फोटोत १ + १ = ३ असं लिहिलंय. तर दुसऱ्या फोटोत हे दोघे एकमेकांकडे पाहत रोमँटिक पोज देताना दिसत आहेत. यात अलीने कलरफूल शर्ट आणि त्यावर पांढऱ्या रंगाचा कोट घातला आहे तर रिचा काळ्या रंगाच्या फ्रिल स्लीव्ह्ज ड्रेसमध्ये दिसत आहे. या फोटोच्या शेवटी गरोदर असल्याचा इमोजी लावला आहे. श्वेता बसु प्रसाद, सैयामी खेर, श्रिया पिळगावकर आणि एलनाझ नोरोझी या कलाकारांनी कमेंट्स करत या जोडप्याला शुभेच्छा दिल्या आहेत.



## नव्याला दिला रिलेशनशिपबाबत सल्ला

जया बच्चन बॉलीवूडमधील ज्येष्ठ अभिनेत्री आहेत. आपल्या कारकिर्दीत त्यांनी अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले. अभिनयाव्यतिरिक्त जया बच्चन आपल्या वैयक्तिक आयुष्यामुळेही अनेकदा चर्चेत असतात. ३ जून १९७३ रोजी जया बच्चन यांनी अभिनेते अमिताभ बच्चन यांच्याबरोबर लग्नगाठ बांधली. त्यांच्या लग्नाला आता जवळपास ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. दरम्यान, नुकत्याच एका कार्यक्रमात जया बच्चन यांनी रिलेशनशिपबाबत वक्तव्य केले आहे. अमिताभ व जया बच्चन यांच्याप्रमाणे त्यांची नात नव्या नवेली नंदाही नेहमीच चर्चेत असते. नव्याचा चाहतावर्गही मोठा आहे. नव्या अभिनय क्षेत्रापासून लांब असली तरी सोशल मीडियावर ती मोठ्या प्रमाणात सक्रिय असते. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करीत ती चाहत्यांना अपडेट देत असते. आता नव्या एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. नुकताच तिचा पॉडकास्ट शो 'व्हॉट द हेल नव्या'चा दुसरा सीझन प्रदर्शित झाला. या कार्यक्रमात नव्याची आजी म्हणजे अभिनेत्री जया बच्चन व आई श्वेता नंदा यांनी हजेरी लावली होती.

दरम्यान, या कार्यक्रमामध्ये जया बच्चन यांनी आपल्या वैयक्तिक आयुष्याबाबत अनेक खुलासे केले आहेत. पॉडकास्टमध्ये जया बच्चन व श्वेता बच्चन यांनी लव्ह लाईफ व रिलेशनशिपबाबत आपले मत व्यक्त केले. नव्याने जया बच्चन यांना आधुनिक डेटिंग पद्धत व प्रेमातील धोक्यांच्या इशाऱ्याबाबत काय वाटते? असा प्रश्न विचारला. यावर जया बच्चन म्हणाल्या, "मी याचा विचारही करत नाही, कारण ते माझे कार्यक्षेत्र नाही. माझ्यासाठी प्रेमाचा अर्थ आपल्या जोडीदाराला सन्मान देणं आहे. तू मला कधी तुझ्या आजोबांना एकेरी नावाने हाक मारताना बघितलं आहेस? जर तुमचा जोडीदार तुम्हाला सन्मान देत नसेल तर ते माझ्यासाठी प्रेमातील धोक्यांचा इशारा असतो.

## रवीना टंडनने नाकारलेलं 'छैया छैया' गाणं



९० च्या काळात आपल्या अभिनयाने प्रेक्षकांचं मन जिंकणारी प्रसिद्ध अभिनेत्री रवीना टंडन उत्तम नर्तिकाही आहे. अलीकडेच 'कर्मा कॉलिंग' या वेबसीरिजमध्ये ती झळकली. रवीना आजही अभिनय क्षेत्रात तितकीच सक्रिय आहे. नुकत्याच झालेल्या तिच्या मुलाखतीमुळे सध्या ती चर्चेत आहे. रवीना टंडनने "छैया छैया" या सुपरहिट गाण्यासाठी नकार दिला होता. या निर्णयावर ती उघडपणे बोलली आहे.बीबीसी नेटवर्कला दिलेल्या मुलाखतीत रवीना टंडन म्हणाली की, तिला 'छैया छैया' हे गाणं ऑफर करण्यात आलं होतं, ज्यात शाहरुख खान आणि मलायका अरोरा आहेत. 'रक्षक' चित्रपटातील 'शेहर की लडकी' या गाण्याच्या यशानंतर तिला 'छैया छैया'ची ऑफर आली होती.'छैया छैया' या गाण्याचा किस्सा सांगत रवीना पुढे म्हणाली, "माझं 'शेहर की लडकी' हे गाणं तेव्हा खूप हिट झालं होतं. म्हणूनच 'छैया छैया'ची ऑफर मला देण्यात आली आणि मला आठवतयं, तेव्हा शाहरुख म्हणाला होता, मणि सरांना तुझ्याशी बोलायचे आहे आणि आमच्यासाठी तू हे गाणं करावं अशी त्यांची इच्छा आहे."रवीनाने नंतर नमूद केले की, तिला खूप अस्वस्थ वाटत होते, कारण तिला मणिरत्नमसह काम करायचे असले तरी परत एक आयटम सॉंग ऑफर केल्यामुळे तिला स्टिरियोटाइप केले गेले असते. याबद्दल बोलताना ती म्हणाली, " तेव्हा मी खूप विचित्र परिस्थितीत अडकले होते, कारण मला मनापासून मणिरत्नम सरांसोबत काम करायचं होतं; परंतु मला पुन्हा फक्त आयटम सॉंग ऑफर केलं जात होतं आणि तेव्हा तुमच्या कामानुसार तुमचं परीक्षण व्हायचं."रवीना पुढे म्हणाली, "ती एक आव्हानात्मक परिस्थिती होती. मला माहीत होतं की, हे गाणं रॉक सॉलिड आहे. माझ्याकडे तेव्हा एकचं पर्याय होता, हे गाणं असं होतं की तुम्ही ते ऐकलं असतं आणि पूर्णपणे त्याच्या प्रेमात पडला असता.

# इंडिया भिडणार ऑस्ट्रेलिया विरुद्ध!

## विजयात बीड जिल्ह्यातील मराठमोळ्या धसने महत्त्वपूर्ण योगदान

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**अंडर-19 क्रिकेट वर्ल्डकपचा अंतिम सामना भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात होणार आहे. त्यामुळे वरिष्ठ टीमच्या झालेल्या पराभवाचा वचपा काढण्यासाठी 11 फेब्रुवारीला दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत. भारतीय संघाने उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेचा पराभव केला. ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानचा पराभव करत फायनलमध्ये धडक मारली. आता दोन्ही संघ जेतेपदासाठी भिडणार आहेत. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील अंतिम सामना भारतीय वेळेनुसार रविवारी 11 फेब्रुवारी रोजी दुपारी 1.30 वाजता सुरू होईल. टीम इंडिया सहाव्यांदा अंडर-19 विश्वचषक जिंकण्याच्या इराद्याने मैदानात उतरणार आहे. भारतीय संघाने आतापर्यंत 5 वेळा अंडर-19 विश्वचषक जिंकला आहे.**



भारतीय चाहत्यांना भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील अंतिम सामना स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर थेट पाहता येणार आहे. याशिवाय, तुम्ही डिस्ने प्लस हॉटस्टारवर लाइव्ह स्ट्रीमिंग पाहू शकाल. हिंदी आणि इंग्रजी व्यतिरिक्त, डिस्ने प्लस हॉटस्टारवर तुम्ही इतर अनेक भाषांमध्ये सामन्याचा आनंद घेऊ शकाल. उदय सहारनच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने बांगलादेशविरुद्धच्या मोहिमेला सुरुवात केली. यानंतर टीम इंडियाने बांगलादेश, आयर्लंड, अमेरिका, न्यूझीलंड, नेपाळ आणि दक्षिण आफ्रिकेचा पराभव केला. भारतीय संघाने या स्पर्धेतील सलग 6 सामने जिंकले. उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानचा 1 गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने 48.5 षटकांत 179 धावा केल्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाने 49.1 षटकांत 9 गडी राखून लक्ष्य गाठले. याआधी भारतीय संघाने उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेचा 2 गडी राखून पराभव केला होता. दुसरीकडे अंडर-19 विश्वचषक 2024 च्या उपांत्य फेरीत भारताने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. आफ्रिकेचा 2 गडी राखून पराभव करून भारताने 9 व्यांदा स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले. भारताच्या विजयात बीड जिल्ह्यातील मराठमोळ्या सचिन धसने महत्त्वपूर्ण योगदान दिले. सचिनने कर्णधार उदय सहारनसोबत भागीदारी करत भारताला अंतिम फेरीत स्थान मिळवून देण्यात महत्त्वाचे योगदान दिले. दक्षिण आफ्रिकेसमोर 245 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने अवघ्या 32 धावांवर 4 विकेट गमावल्या. यानंतर सचिन धस आणि कर्णधार सहारन यांनी मिळून पाचव्या विकेटसाठी 171 धावांची (187 चेंडू) भागीदारी केली आणि संघाच्या विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले. सचिन धस हा महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील आहे. सचिनचे वडील संजय धस यांनी आधीच ठरवले होते की ते आपल्या मुलाला क्रिकेटर करायचं. सचिनच्या वडिलांनी 'इंडियन एक्स्प्रेस'ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, त्यांनी आपल्या मुलाचे नाव सचिन तेंडुलकरच्या नावावर ठेवले आहे. सचिन धसच्या वडिलांनी सांगितले की, सुनील गावसकर यांच्यानंतर सचिन तेंडुलकर त्यांचा आवडता क्रिकेटर होता, त्यामुळे त्यांनी आपल्या मुलाचे नाव दिग्गज तेंडुलकरच्या नावावर ठेवले. सचिनचे वडील संजय म्हणाले की, त्यांनी सुद्धा विद्यापीठ स्तरावर क्रिकेट खेळला आहे. सचिनच्या आईबद्दल सांगायचे तर त्या महाराष्ट्र पोलिसात सहाय्यक पोलिस निरीक्षक (एपीआय) आहेत. सचिनची आईही कबड्डीपटू राहिली आहे.सचिनने पुण्यातील 19 वर्षांखालील निमंत्रित स्पर्धेत सहा षटकार मारून सर्वांना आश्चर्यचकित केले. सचिनला पाहून स्पर्धेचे आयोजक पूर्णपणे चकित झाले. शानदार षटकार पाहून त्याने सचिनच्या बॅटचीही तपासणी केली.

### पाचव्या विकेटसाठी 171 धावा

दुसरीकडे अंडर-19 विश्वचषक 2024 च्या उपांत्य फेरीत भारताने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. आफ्रिकेचा 2 गडी राखून पराभव करून भारताने 9 व्यांदा स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले. भारताच्या विजयात बीड जिल्ह्यातील मराठमोळ्या सचिन धसने महत्वपूर्ण योगदान दिले. सचिनने कर्णधार उदय सहारनसोबत भागीदारी करत भारताला अंतिम फेरीत स्थान मिळवून देण्यात महत्त्वाचे योगदान दिले. यानंतर सचिन धस आणि कर्णधार सहारन यांनी मिळून पाचव्या विकेटसाठी 171 धावांची (187 चेंडू) भागीदारी केली आणि संघाच्या विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# यंदाचे ऑलिम्पिक पूर्वीपेक्षा आव्हानात्मक : पीव्ही सिंधू

## ऑलिम्पिक पदकविजेत्या पीव्ही सिंधूने दमदार पुनरागमनाचे ध्येय

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**दुखापतीमुळे गेला काही काळ बॅडमिंटन कोर्टपासून दूर असलेल्या दोन वेळच्या ऑलिम्पिक पदकविजेत्या पीव्ही सिंधूने दमदार पुनरागमनाचे ध्येय बाळगले आहे. यावर्षी पॅरिस येथे होणाऱ्या ऑलिम्पिकमध्ये पदककमाई करणे आव्हानात्मक असेल याची सिंधूला जाण असून सुवर्णयश मिळण्यासाठी आपल्याला अधिक हुशारीने खेळ करावा लागेल असे तिला वाटते. यासाठी अनुभवाची शिदोरी फायदेशीर ठरेल असे सिंधू गुरुवारी म्हणाली.**



माजी जगज्जेत्या सिंधूला गेल्या १८ महिन्यांत लौकिकाला साजेशी कामगिरी करता आलेली नाही. त्यातच तिला दुखापतींचाही सामना करावा लागला आहे. २०२२च्या राष्ट्रकुल स्पर्धेत तिच्या डाव्या पायाला दुखापत झाली होती. त्यातून पूर्णपणे सावरणार इतक्यात गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये तिच्या डाव्या गुडघ्याला दुखापत झाली. त्यामुळे तिला बॅडमिंटन कोर्टपासून दूर राहावे लागले. “२०१६ आणि २०२०च्या तुलनेत यंदा पॅरिस येथे होणारी ऑलिम्पिक स्पर्धा वेगळी आणि अधिक आव्हानात्मक असेल. मात्र, माझ्या गाठीशी आता पूर्वीपेक्षा अधिक अनुभव आहे. यंदा यशस्वी कामगिरी करण्यासाठी मला अधिक हुशारीने खेळावे लागेल,” असे सिंधू म्हणाली. “महिला विभागातील अव्वल १०-१५ खेळाडू या तुल्यबळ आहेत. त्यामुळे समोर कोणतीही खेळाडू असो, विजय मिळवणे सोपे नसते. तुम्हाला लक्षपूर्वक खेळ करावा लागतो. तुमची पहिली योजना यशस्वी ठरत नसल्यास दुसऱ्या पर्यायाचा विचार करावा लागतो. तगड्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध खेळताना काही वेळा काय करावे हे तुम्हाला सूचत नाही. अशा वेळी संयम राखणे महत्त्वाचे असते. त्यासाठी तुम्ही मानसिकदृष्ट्या कणखर असणे आवश्यक आहे,” असेही सिंधूने नमूद केले.

### अनुभवाची शिदोरी फायदेशीर ठरेल

सिंधूने २०१६च्या रिओ ऑलिम्पिकमध्ये रौप्य, तर २०२०च्या टोक्यो ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक पटकावले होते. मात्र, गेल्या काही काळापासून ती अपयशाच्या गर्तेत अडकली आहे. गेल्या वर्षी तिला बहुतांश स्पर्धांमध्ये पहिल्याच फेरीत पराभव पत्करावा लागला होता.दुखापतीमुळे गेला काही काळ बॅडमिंटन कोर्टपासून दूर असलेल्या दोन वेळच्या ऑलिम्पिक पदकविजेत्या पीव्ही सिंधूने दमदार पुनरागमनाचे ध्येय बाळगले आहे. यावर्षी पॅरिस येथे होणाऱ्या ऑलिम्पिकमध्ये पदककमाई करणे आव्हानात्मक असेल याची सिंधूला जाण असून सुवर्णयश मिळण्यासाठी आपल्याला अधिक हुशारीने खेळ करावा लागेल असे तिला वाटते. यासाठी अनुभवाची शिदोरी फायदेशीर ठरेल असे सिंधू गुरुवारी म्हणाली.